सेंटर ऑफ एक्सलन्स कृषि उत्पादकता वाढीकरीता यंत्रमानव ड्रोन व स्वयं चलित यंत्राद्वारे डिजीटल शेती प्रकल्प

राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प (नाहेप)
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

राज्यस्तरीय एक आठवड्याचे वेबिनार

# डिजिटल कृषि तंत्रज्ञानाद्वारे शेतकरी महिलांची आत्मनिर्भरता









वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## नाहेप, वनामकृवि, परभणी विषयी

सेंटर ऑफ एक्सलन्स कृषि उत्पादकता वाढीकरीता यंत्रमानव, ड्रोन व स्वयंचलित यंत्राव्दारे डिजीटल ेती प्रकल्प, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या वतीने **डिजीटल कृषि तंत्रज्ञानाव्दारे शेतकरी महिलांची आत्मनिर्भता** या एक आठवडयाच्या राज्य स्तरीय वेबीनारचे आयोजन दिनांक ६- १० जुलै, २०२० या कालावधीत करण्यात आले आहे. हा वेबिनार अद्ययावत कृषि विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्राच्या (CAAST) माध्यमातुन भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि वर्ल्ड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषि उच्च ाक्षिण प्रकल्प (नाहेप) अंतर्गत आयोजित करण्यात आला आहे.

## पार्श्वभुमी

भारत हा देश अनेक नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध आहे. काळाची गरज ओळखून या संसाधनांच्या शाश्वत व्यवस्थापना व्दारे शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रगती साधणे आता अत्यंत गरजेचे झाले. आहे. शेती कामांमध्ये महिलांचा सहभाग ४५ टक्कया पेक्षाही अधिक प्रमाणात आहे. आपण पाहतो, शेती मधील अनेक कामे जसे की पेरणी, निंदणी, खत घालणे, वेचणी, कापणी, मळणी इत्यादी अधिक तर प्रमाणात महिला करतात. परंतु ह्या अद्यश्य स्वरूपातील कार्यरत कामकरी महिलांची कुठेही दखल घेतली जात नाही. एव्हाना त्यांना उत्पादनक्षम व्यक्ती म्हणून देखील अनेकांच्या लेखी नसते. तेव्हा या कामकरी महिलांना आधुनिक शेती तंत्रज्ञान अवगत करून, त्यांच्या कार्यामध्ये सुलभता यावी, त्यांचे कष्ट कमी व्हावे या उद्देशाने या वेबिनारचे आयोजन करण्यात येत आहे. अनेक शेतकरी मेळावे, मिटिंग मध्ये शेतकरी महिलांना त्यांच्या दैनंदिन व्यापातून, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि शेतकामा मधून वेळ काढून शहराच्या ठिकाणी किंवा इतर गावांना जाऊन इच्छा असुन ही हे ज्ञान घेणे शक्य होत नाही. परंतु या करोना विषाणू प्रादुर्भावाच्या काळात आपल्याच ठिकाणाहून, गावातून, शेतातून या शेतकरी महिला त्यांच्या दैनंदिन कार्यासोबतच या आधुनिक शेती तंत्रज्ञानाविषयी माहिती ऑनलाइन स्वरुपात पाहु शकतात, तेव्हा अधिकाधिक शेतकरी महिलांनी या संधीचा लाभ घ्यावा.

## उद्दिष्टे

या राज्यस्तरीय एक आठवड्याच्या वेबिनारद्वारे शेतकरी महिलांना डिजिटल कृषी तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन आत्मनिर्भर करण्यासाठी खालील उद्दिष्टे नजरेसमोर ठेवण्यात आली आहेत.

- शेतकरी महिलांना अद्ययावत डिजिटल कृषी तंत्रज्ञानाद्वारे आत्मनिर्भर होण्यास उद्युक्त करणे.
- शेतकरी महिलांना शासकीय योजनांची माहिती देणे तसेच कृषि उद्योगांव्दारे आर्थिक सक्षमीकरणासाठी अभिमुख करणे.
- शेतकरी महिलांनी स्वतःचे व कुटूंबाचे मानसिक आरोग्य जपणे व जीवना विषयी सकारात्मकता विकसित करणे.

## लाभार्थी

संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकरी महिला, ग्रामीण, शेती कार्यात सहभागी युवती, विविध, गटशेती करणाऱ्या, जलसंधारण तथा तत्सम क्षेत्रातील कार्यकर्त्या तसेच बचत गटाच्या माध्यमातुन एकत्रित जोडलेल्या महिला आणि शेती आधारीत गृह उद्योग, मध्यम व मोठे उद्योग करणाऱ्या महिला, महाराष्ट्र राज्याच्या कृषि विभागातील कृषि विस्तारक, कृषि अधिकारी यांच्याशी निगडीत महिला शेतकरी गट, कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातुन शेतकरी महिलांसोबत कार्यरत असलेले विषय तज्ञ तथा महिला गटांच्या सदस्य, शासकीय कार्यालयाचे कृषि संबंधित कर्मचारी, प्रतिनिधी, प्रगतीशील शेतकरी महिला इत्यादी या वेबीनारमध्ये नाव नोंदणी करण्यास पात्र आहेत.

## नाव नोंदणी

या वेबीनारचा महाराष्ट्र राज्यातील अधिकाधीक जिल्हयातील शेतकरी महिलांना लाभ मिळावा या दृष्टीने प्रथम नाव नोंदणी करण्यास प्रथम प्राध्यान्य या तत्वावर ४५० लाभार्थींना निवडण्यात येईल. या लाभार्थ्यांचा एक दिवस अगोदर व्हॉटस् ॲप ग्रुप तयार करुन वेबीनार निगडीत माहिती, सुचना या ग्रुपमध्ये देण्यात येईल. या करीता https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf_YUxh9TaszNnFg20p07mtAxGL0dES7gemYoc8erDXRQ/viewform?usp=sf_linkv या लिंकवर किंवा दिलेल्या क्यु आर कोडवरुन दि. ५ जुलै, २०२० सकाळी ८.०० वाजे पर्यंत नाव नोंदणी करावी. **या वेबीनारसाठी कोणतेही शुल्क लागु नाही.** वेबीनार दरम्यान, दररोज ५ दिवस ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरुन दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत, दोन तज्ञाची व्याख्याने प्रसारीत होतील. या पैकी प्रत्येक व्याख्यान हे जवळपास १.०० तासाचे असेल व व्याख्यानानंतर तज्ञांची व लाभार्थ्यांची संबंधित विषयावर प्रश्नोत्तरे, चर्चा होईल.

# राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प (नाहेप)
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## राज्यस्तरीय एक आठवड्याचे वेबिनार
# डिजिटल कृषि तंत्रज्ञानाद्वारे शेतकरी महिलांची आत्मनिर्भरता

### विषय व तज्ञ वक्ते

| दिवस / दिनांक | तज्ञ वक्ते / अतिथी | विषय | फोटो |
|---|---|---|---|
| दिवस पहिला<br>दि. ०६.०७.२०२० | उदघाटन समारंभ<br>डॉ.लखन सिंग<br>संचालक, अटारी पुणे | शेतीमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब : काळाची गरज |  |
| दि.०६.०७.२०२० | पद्मश्री राहीबाई पोपेरे<br>बिज माता | यशोगाथा : सीड बँक निर्मीतीची |  |
| दि.०६.०७.२०२० | सौ.कमलताई परदेशी<br>अंबिका मसाले<br>दौंड | महिलांसाठी कृषि आधारीत गृह उद्योग संधी |  |
| दिवस दुसरा<br>दि.०७.०७.२०२०<br>१२-०१.३० | डॉ. डि.एल. जाधव,<br>विभागीय कृषि<br>सहसंचालक औरंगाबाद | शेतकरी महिलांसाठी शासकीय योजना |  |
| १.३०-०३ | डॉ.जयश्री झेंड<br>सहयोगी अधिष्ठाता<br>सा.वि.म.वनामकृवि, परभणी | शेतकरी महिलांसाठी श्रम बचतीची, कमी किंमतीची साधने |  |
| दिवस तिसरा<br>दि.०८.०७.२०२०<br>१२-१.३० | श्री.दिपक भिंगारदेव<br>एम.सी.ई.डी.,औरंगाबाद | शेतकरी महिलांचे कृषि उद्योगाव्दारे आर्थिक सक्षमीकरण |  |
| १.३०-०३ | डॉ.साधना देशमुख<br>मानसोपचार तज्ञ,<br>आलीयावर जंग हॉस्पीटल, मुंबई | ग्रामीण महिलांच्या मानसिक आरोग्याची जपवणूक |  |

| | | | |
|---|---|---|---|
| दिवस चौथा<br>दि.०९.०७.२०२०<br>१२-१.३० | श्री.संजय पाटील<br>बाएफ, पुणे | महिला सहभागातुन स्थानिक पिकांची शास्त्रोक्त संवर्धन पध्दती |  |
| १.३०-०३.०० | श्री. प्रितम वंजारी<br>वसुंधरा, पुणे | डिजीटल तंत्रज्ञाना आधारे महिलांसाठी शेती कामामध्ये सुलभता |  |
| दिवस पाचवा<br>दि.१०.०७.२०२०<br>१२-३.०० | समारोप समारंभ<br>डॉ.आर.सी .अग्रवाल<br>राष्ट्रीय संचालक, नाहेप,<br>भा.कृ.अ.प.नवी दिल्ली | शेती कामातील महिलांचा सहभाग आणि डिजीटलायझेशनची आवश्यकता |  |
| दि.१०.०७.२०२० | श्री. ज्ञानेश्वर बोडखे,<br>अध्यक्ष<br>अभिनव फार्मर्स क्लब, पुणे | गट शेतीद्वारे शेतकरी महिलांनो साधुया प्रगती |  |
| दि.१०.०७.२०२० | श्रीमती स्वाती शिंगाडे<br>अध्यक्षा<br>प्युअर ऑरगॅनिक ग्रुप, बारामती | अद्ययावत शेती तंत्रज्ञान : शेतकरी महिलांची भुमिका |  |

सदरील वेबीनारसाठी नाव नोंदणी केलेल्या शेतकरी महिलांना झुम ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा उपयोग करुन खालील आय.डी. व पासवर्डद्वारे सहभागी होता येईल.

आय डी : ९११५३५०६१६

पासवर्ड : १२३४५

सदरील वेबीनार संपूर्ण महाराष्ट्र राज्यात युटयुब वरुन थेट प्रक्षेपीत करण्यात येणार आहे. ज्या महिलांना नाव नोंदणी करता आली नाही त्यांना nahep_dfsrdavnmkv या लिंकद्वारे हा वेबीनार पाहता येईल.

**पॅट्रॉन**

**डॉ. अशोक ढवण**
मा. कुलगुरू
वनामकृवि, परभणी

**डॉ. आर.सी. अग्रवाल**
राष्ट्रीय संचालक, नाहेप
भा.कृ.अ.प.नवी दिल्ली

**प्रमुख आयोजक**

**डॉ. गोपाळ शिंदे**
प्रमुख संशोधक, नाहेप
वनामकृवि,परभणी

**डॉ. जयश्री झेंड**
सहयोगी अधिष्ठाता
सा.वि.म. वनामकृवि,परभणी

**डॉ. धर्मराज गोखले**
संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता
वनामकृवि,परभणी

**आयोजन सचिव**

**डॉ. वीणा भालेराव**
सहयोगी प्राध्यापक तथा
कोअर टिम सदस्य
नाहेप, वनामकृवि, परभणी

**आयोजन उपसचिव**

**डॉ. गोदावरी पवार**
सहयोगी प्राध्यापक तथा
कोअर टिम सदस्य
नाहेप, वनामकृवि, परभणी

**डॉ. मेघा जगताप**
सहाय्यक प्राध्यापक तथा
नोडल ऑफीसर (पर्यावरण)
नाहेप, वनामकृवि, परभणी

**वेबीनार समन्वयक**

**इंजी. अपूर्वा देशमुख** **डॉ. रश्मी बंगाळे** **डॉ. अविनाश काकडे** **इंजी. शैलेश शिंदे** **श्री. जगदीश माने**